**सं.फौ.प्र.क्र.४९७/२०२१** **निशाणी क्र.७९**

**<u>फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ मधील कलम ३१३ अन्वये आरोपीचे निवेदन</u>**

नाव – सलमान सलिम बागवान वय – ३० वर्षे,

व्यवसाय – व्यापार राहणार – कुंभार गल्ली कमानवेस, अकोले,
ता.अकोले, जि.अहमदनगर.

प्र.१ तुम्हाला विचारण्यात येणा–या प्रश्नांची उत्तरे देण्यास तुम्ही बांधील नाही, जर प्रश्नाचे उत्तर चुकले तर त्यासाठी तुम्हाला कोणतीही शिक्षा होणार नाही, पण तुम्ही दिलेली उत्तरे ही विचारात घेतली जातील, हे समजले काय ?

उत्तर होय.

प्र.२ साक्षीदार क्र.१ फिर्यादी सुनंदा मच्छिंद्र कर्जुले यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्या पेंशन धारक आहेत. तुमचा अकोले येथे फळ विकण्याचा व्यवसाय आहे. त्यांचा मुलगा अमोल याचे तुमचे दुकानामध्ये कायम येणे–जाणे असल्यामुळे त्यांची व तुमची ओळख झाली व त्यातून मैत्रीचे व घरगुती संबंध निर्माण झाले, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे?

उत्तर खोटे आहे.

प्र.३ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, तुम्ही फळ विक्रीचा व्यवसाय करीत असताना तुम्हाला तुमच्या व्यवसायात प्रगती करावयाची असल्याने तुम्हाला पैशाची गरज निर्माण झाली. त्यामुळे, तुम्ही त्यांच्याकडे पैशाची मागणी केली. तुमचे व त्यांचे संबंध घरगुती व विश्वासाचे असल्याने त्यांनी तुम्हाला दिनांक २१.०८.२०२० रोजी रक्कम रुपये २,००,०००/– (अक्षरी रुपये दोन लाख मात्र) दिली. तुम्ही त्यांना ते पैसे लवकर परत करतो, असे सांगितले, याबाबत तुमचे

काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.४ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, बरेच दिवस होवून सुध्दा तुम्ही घेतलेली ऊसनवार रक्कम त्यांना दिली नाही. त्या रक्कमेबाबत त्यांनी तुमच्याकडे वारंवार मागणी केली. परंतु, तुम्ही त्यांना उडवा उडवीची उत्तरे दिली, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.५ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांनी तुमच्याकडे त्या रक्कमेबाबत जास्तच तगादा लावला व तुमची समक्ष भेट घेतली असता तुम्ही त्यांना म्हणाला की, सध्या तुमच्याकडे रोख स्वरुपात त्यांना देण्यास पैसे नाहीत. त्यामुळे, तुम्ही त्यांना दिनांक २७.०७.२०२१ रोजीचा रक्कम रु. २,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख मात्र) चा बँक ऑफ बडोदा, शाखा अकोले, ता.अकोले या बँकेचा निशाणी ४५ वरील चेक नं.०००००२ चा चेक दिला. तुम्ही त्यांना चेक बँकेत भरा, तुम्हाला रक्कम मिळून जाईल, अशी हमी व भरोसा दिला, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.६ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांनी तो चेक त्यांचे बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा अकोले, ता.अकोले, जि.अहमदनगर येथील खात्यामध्ये वटणेकरिता दिनांक २७.०७.२०२१ रोजी भरला असता त्या बँकेने तो चेक फंड इनसफिशिएंट असा शेरा मारून दिनांक २९.०७.२०२१ रोजीचे निशाणी ४६ वरील रिटर्न मेमोसह परत दिला, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.७ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांनी तुम्हाला कळविले असता तुम्ही त्यांना म्हणाला की, "तुम्ही तो चेक परत बँकेत भरा. तुम्हाला तुमचे पैसे मिळून जातील. आता माझे खात्यावर पैसे आहेत," याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.८ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांनी तो चेक पुन्हा बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा अकोले, ता.अकोले, जि.अहमदनगर येथे वटणेकरिता दिनांक ३१.०८.२०२१ रोजी भरला असता तो चेक फंड इनसफिशिएंट असा शेरा मारून दिनांक ०१.०९.२०२१ रोजीचे निशाणी ४७ वरील रिटर्न मेमोसह परत आला, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.९ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांनी तुम्हाला त्या चेकबाबत वारंवार कळविले असता तुम्ही जाणुनबुजून बँकेत गेला नाहीत व त्यांची भेट घेतली नाही. तुम्ही जाणीवपूर्वक त्यांची फसवणूक करून विश्वासघात केला आहे, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.१० यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांनी दिनांक २७.०९.२०२१ रोजी तुम्हाला निशाणी ४६ वरील रजिस्टर नोटीस पाठवून चेकच्या रक्कमेची मागणी केली असता तुम्ही बाहेरगावी गेला आहेत, असा शेरा मारून ती नोटीस दिनांक २८.०९.२०२१ रोजी निशाणी ५० वरील लखोटा व पोस्ट पावतीसह परत आली. त्यांनी तुम्हाला नोटीस पाठविलेबाबतची पावती निशाणी ४९ वर आहे. तुमचे आई–वडील हे तुमच्यासह केस मध्ये दिलेल्या पत्त्यावर राहत आहेत.

मात्र तुम्ही जाणूनबुजून नोटीस घेतलेली नाही व चेकची रक्कम अदा केलेली नाही, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.११ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, तुम्ही त्यांना देय असलेली रक्कम रु.२,००,०००/- (रुपये दोन लाख मात्र) ही त्यांना कायदेशीर देणे असतानाही तुम्ही त्यांना दिलेल्या चेकच्या रक्कमे ऐवढी रक्कम खात्यावर जाणूनबुजून शिल्लक ठेवली नाही. तुम्ही त्यांची फसवणूक करण्याच्या उद्देशाने चेक दिला व तो अनादरीत झाला आहे. अशा प्रकारे तुम्ही निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टचे कलम १३८ अन्वये फौजदारी गुन्हा केला आहे व त्यांनी फसवणूक करून त्यांचे आर्थिक नुकसान केले आहे, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.१२ साक्षीदार क्र.२ संदिप सुभाष गोलवड यांच्या पुराव्यात असे आले आहे की, ते बँक ऑफ बडोदा, शाखा अकोले, येथे मॅनेजर या पदावर कार्यरत असून त्यांना या केसचे समन्स प्राप्त झाले आहे. तुम्ही त्यांचे बँकेचा खातेदार असून तुमचा खाते क्र.४२१२८१००००४७२१ असा आहे. तुम्ही खाते उघडताना अकाऊंट ओपनींग फॉर्म स्वत:चे हस्ताक्षराने भरून दिलेला आहे. त्याचे बरोबर तुम्ही आधार कार्ड व पॅन कार्डची झेरॉक्स प्रत दिलेली आहे. तुमचे सहीचा नमुना त्यांचे बँकेचे सिस्टीमला नमूद केलेला आहे, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.१३ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, तुम्हाला बँकेने दिनांक १३.०२.२०२० रोजी खाते क्र.४२१२८१००००४७२१ चे चेक क्र.००००0१ ते चेक क्र.००००१५ या नंबरचे चेक बूक दिले. त्या

चेकपैकी चेक क्र.००००0२ हा दिनांक २९.०७.२०२१ रोजी बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा अकोले यांचे मार्फत त्यांचे बँकेत क्लेअरिंगसाठी आल्याने त्यांचे बँकेत असलेल्या तुमच्या खात्यात पुरेशी रक्कम नसल्याने ती रक्कम रु.२,००,०००/– (रुपये दोन लाख मात्र) बँकेतील अकाऊंटमधून डेबीट न होता तो चेक रिटर्न झाला, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खरे आहे.

प्र.१४ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यानंतर तो चेक दिनांक ०१.०९.२०२१ रोजी पुन्हा क्लेअरिंगसाठी आला. मात्र तेव्हाही तुमच्या खात्यामध्ये पुरेशी रक्कम नसल्याने तो परत गेला. त्या संदर्भातील अकाऊंट लेजर स्टेटमेंट त्यांनी साक्षीला येताना कॉम्प्यूटरमधील प्रिंट सही शिक्क्यानिशी दाखल केलेली आहे व चेक बूक मेंटेनन्स स्टेटस सुध्दा दाखल केलेले आहे, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खरे आहे.

प्र.१५ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांनी वर्णनयादी सोबत तुमचे बँक ऑफ बडोदा, शाखा अकोले, ता.अकोले, जि.अहमदनगर येथे खाते ओपन करताना भरलेला फॉर्म, आधार कार्ड, पॅन कार्ड झेरॉक्स प्रत, चेकबूक मेंटेनन्स स्टेटस कॉम्प्युटर प्रिंट, अकाऊंट लेजर स्टेटमेंट ही कागदपत्रे दाखल केली आहेत, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खरे आहे.

प्र.१६ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, तुम्ही नियमानुसार त्यांच्या बँकेचा अकाऊंट ओपनींग फॉर्म घेवून संपूर्ण पूर्तता केली आहे. त्यांनी ओरिजिनल अकाऊंट फॉर्मची साक्षांकीत प्रत अभिलेखावर दाखल केली

आहे. तो अकाऊंट ओपनींग फॉर्म निशाणी ६२ वर आहे, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.१७ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, तुम्ही केवायसी साठी त्यांच्या बँकेमध्ये तुमचे आधार कार्ड व पॅन कार्ड दाखल केले होते. तुम्ही त्यांचे बँकेमध्ये अकाऊंट उघडल्याबाबतचे कॉम्प्यूटर सिस्टीमवरून घेतलेली अकाऊंट ओपनींग प्रिंट निशाणी ६३ वर दाखल केली आहे, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.१८ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, तुम्ही त्यांचे बँकेमध्ये खाते उघडल्यानंतर जी चेक बुकसाठी मागणी केली होती, त्यानुसार त्यांचे बँकेने तुम्हाला चेक बुक इशू केलेबाबतची माहिती देणारी साक्षांकीत प्रत त्यांनी याकामी दाखल केली आहे, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.१९ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, निशाणी ४५ वरील चेक क्र.००००००२ हा बँक ऑफ महाराष्ट्रकडून त्यांचे बँकेत दिनांक २९.०७.२०२१ रोजी वटण्यासाठी आला होता. परंतु, तुमच्या खात्यामध्ये पुरेशी रक्कम नसल्यामुळे तो चेक वटला गेला नाही. त्या संदर्भातील अकाऊंट स्टेटमेंट त्यांनी निशाणी ६४ वर दाखल केले आहे, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.२० यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, तो चेक दिनांक ०१.०९.२०२१ रोजी पुन्हा वटण्यासाठी त्यांचेकडे आला होता. परंतु, पुन्हा तुमच्या खात्यामध्ये पुरेशी रक्कम नसल्याने तो चेक फंड इनसफिशिएंट अशा शे-यानिशी परत आला. त्याबाबतचे अकाऊंट

स्टेटमेंट त्यांनी निशाणी ६५ वर दाखल केले आहे, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.२१ तुम्हाला शपथेवर जबाब द्यायचा आहे काय ?

उत्तर होय.

प्र.२२ तुम्हाला साक्षीदार तपासावयाचे आहेत काय ?

उत्तर होय.

प्र.२३ तुम्हाला केसबद्दल आणखी काही सांगावयाचे आहे काय ?

उत्तर माझ्याविरुद्ध खोटी केस दाखल केली आहे.

S S Borham

आरोपी

समक्ष

19.1.2026

(डी.एम.हिंग्लजकर)

**दिनांक – १९.०१.२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले.**

**<u>प्रमाणपत्र</u>**

वर नमुद आरोपीचा जबाब माझे समक्ष त्याच्या सांगणेप्रमाणे खरा व बरोबर नोंदविणेत आला आहे.

समक्ष

19.1.2026

(डी.एम.हिंग्लजकर)

**दिनांक – १९.०१.२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले.**